लोकमत

सात पथके होती आरोपींच्या मागावर; आंतरराज्य टोळी जेरबंद

# थार जीपमधून रेकी करून व्यापाऱ्याचे केले होते अपहरण

**रमेश कदम**
लोकमत न्यूज नेटवर्क

**आखाडा बाळापूर** : कळमनुरी तालुक्यातील आडा येथील एका व्यापाऱ्याचे अपहरण करून एक कोटी रुपयांची मागणी करणाऱ्या टोळीला २४ तासांच्या आत पकडून पोलिसांनी व्यापाऱ्याची सुटका केली. व्यापाऱ्याचे अपहरण करण्यापूर्वी आरोपींनी थार जीपमधून रेकी केली होती, अशी माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली.

आडा येथील व्यापारी गणपतराव शिंदे यांचे ३ ऑक्टोबर रोजी रात्री ७.३५ वाजेच्या सुमारास कांडली फाटा येथील उड्डाणपुलाखालून काहीजणांनी अपहरण केले होते. आरोपींनी त्यांना सोडण्यासाठी कुटुंबीयाकडे एक कोटी रुपयांची मागणी केली होती. घटनेचे गांभीर्य पाहता पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी आखाडा बाळापूर येथे धाव घेत तपासासाठी सात पथके तयार केली. या पथकांनी अचूक व गोपनीय माहिती काढली. तांत्रिक अभ्यास करून पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, पोलिस उपनिरीक्षक विक्रम विठुबोने यांचे पथक छ. संभाजीनगरकडे तत्काळ रवाना केले. यावेळी व्यापारी गणपतराव शिंदे यांना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अब्दीमंडी भागात ओलीस ठेवल्याचे पथकांना समजले. आरोपी निष्पन्न झाल्यानंतर इतर पथकेही त्यांच्या मदतीला रवाना झाली. त्यावरून या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने छापा टाकत व्यापारी गणपतराव शिंदे यांची सुटका करीत सहा आरोपी ताब्यात घेतले. यात सुरजसिंग उर्फ सुरेंद्र सिंग जगतसिंग गाडीवाले (रा. नंदिग्राम सोसायटी, नांदेड), राधेश्याम पंजाबराव भालेराव (रा. महाराणा प्रताप चौक, नांदेड), शेख तौसीफ शेख समीर (बारी कॉलनी, छ. संभाजीनगर), मुदस्सर हुसेन एकबाल हुसेन (रा. खलवट चारमिनार, हैदराबाद, तेलंगाणा राज्य), सईद शाकेर अली सईद नासेर अली (रा. कासम बारी दर्गा, बडेगाव, छ. संभाजीनगर), शेख नजीर शेख शफी (रा. आसेफीय कॉलनी, टाऊन हॉल, छ. संभाजीनगर) यांचा समावेश आहे. तसेच अन्य दोन आरोपी फरार असून, पथक त्यांचा शोध घेत आहे. यात आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे. आरोपींवर खून, खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा, जबरी चोरी असे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. तसेच नांदेड व कर्नाटक (बिदर)मध्ये गुन्हे करून फरार असल्याचेही निष्पन्न झाले.



## टोलनाका, पेट्रोल पंप, चौकांतील सीसीटीव्ही तपासले

व्यापाऱ्यांचे अपहरण केल्यानंतर पथकांनी पेट्रोल पंप, टोल नाके, मुख्य चौकातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करीत आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

## गुड डिक्टेशनसाठी प्रस्ताव पाठविणार

पथकाने तपासात वापरलेली पद्धत व तांत्रिक विश्लेषण करीत व्यापाऱ्याची सुटका केली. आरोपींनाही बेड्या ठोकल्या. या पथकाने वापरलेली पद्धतीचा राज्यातील इतरही प्रकरणात मदत व्हावी, यासाठी गुड डिक्टेशनचा प्रस्ताव पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठविणार असल्याचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले.

## दोन गावठी पिस्तूल, काडतूस जप्त

यावेळी पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली कार, दोन गावठी पिस्तूल, एक जिवंत काडतूस, नऊ मोबाइल असा एकूण १५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

## डीआयजी, एसपींकडून पथकाला रिवॉर्ड मिळणार

अपहरणकर्ते सराईत गुन्हेगार असू शकतात, हे माहिती असतानाही पोलिसांनी आरोपींना शिताफीने पकडत व्यापाऱ्याची सुटका केली. पोलिसांच्या कामगिरीबद्दल नांदेडचे विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी पथकाचे कौतुक करीत रिवॉर्ड जाहीर केले. या पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, राजेश मलपिलू, उपनिरीक्षक विक्रम विठुबोने, कपिल आगलावे, पोलिस अंमलदार राजू ठाकूर, नितीन गोरे, किशोर सावंत, दत्ता नागरे, आकाश टापरे, आझम प्यारेवाले, विशाल खंडागळे, नरेंद्र साळवे, हरिभाऊ गुंजकर, इरफान पठाण, प्रदीप झुंगरे, तसेच आमदार बाळापूरचे पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, सपोनि बसवंते आदींचा सहभाग होता.